# कामविश्व
## (सांसारिकांचे)

**डॉ. लीना मोहाडीकर**
लैंगिक-वैवाहिक समस्यातज्ज्ञ

**ॐ पब्लिकेशन्स्**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**कामविश्व (सांसारिकांचे) : Kamvishwa (Sansarikanche)**
डॉ. लीना मोहाडीकर

**© डॉ. लीना विलास मोहाडीकर**
२०१, बिझनेस स्क्वेअर, दुसरा मजला,
एस. पी. कॉलेजसमोर,
१६७६ सदाशिव पेठ, पुणे- ३०
फोन नं. २४४३४८४२

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
फेब्रुवारी, २०१३

**किंमत**
रुपये १५०/-

# प्रस्तावना

१९८६ साली 'मेनका प्रकाशन' ने 'कामविश्व' अविवाहितांचे, नवविवाहितांचे, सांसारिकांचे अशा तीन भागांत प्रसिद्ध केलं, आणि नंतरही तिन्ही पुस्तकांच्या आवृत्त्या निघाल्या. आता तीनही पुस्तकांच्या प्रती संपून अनेक महिने लोटले. वाचकांच्या आणि पुस्तक विक्रेत्यांच्या वाढत्या मागण्यांमुळे आता 'कामविज्ञान प्रकाशन' तर्फे तिन्ही पुस्तकांच्या सुधारित आवृत्त्या काही नवीन कथा-लेखांचा समावेश करून वाचकांच्या हातात ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. ॐ पब्लिकेशन्सतर्फे नवीन आवृत्ती वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

नवीन आवृत्तीमध्ये पुढील नवीन लेखांचा समावेश केला आहे. 'कामविश्व अविवाहितांचे'मध्ये 'हस्तमैथुनी जे रंजले-गांजले', 'ब्लॅकमेल', 'धास्ती अपूर्णत्वाची', 'चुकलेली प्रेमिका' या नवीन लेखांचा समावेश केला आहे.

'कामविश्व नवविवाहितांचे'मध्ये 'रात्र मधुचंद्राची', 'दिसतं तसं नसतं', 'मदनाचे मोजमाप', 'कुरूपता पाश दैवे ज्याचा...', 'लैंगिक गणित कच्चे ज्यांचे', 'नशा वेगळेपणाची' अशा सहा नवीन कथांचा समावेश केला आहे.

'कामविश्व सांसारिकांचे'मध्ये 'सुपातले अन् जात्यातले', 'लक्ष्मणरेषेतले व्यभिचारी', 'रडक्या पुरुषार्थाला सेक्सचा आधार', 'माघार मदनाची' आणि 'पत्नी और वो' या पाच नवीन लेखांना समाविष्ट करून घेतलं आहे.

'कामविश्व' प्रथम प्रकाशित झाल्याला आज ११ वर्षं झाली. या अकरा वर्षांत जगामध्ये समाज-जीवनाबाबतीत आणि कामजीवनाबाबतीत असंख्य घडामोडी घडल्या. दूरदर्शनसारख्या प्रसारमाध्यमाच्या प्रचंड जागतिकीकरणामुळे पाश्चिमात्त्य संस्कृतीचा प्रचंड प्रभाव जनमानसावर पडू लागला आहे. कामभावाचं

बाजारीकरण झालं आहे. जाहिराती-चित्रपटांमधून, वेगवेगळ्या दूरदर्शन कार्यक्रमांमधून, नृत्य-गाण्यांमधून सेक्सवर म्हणजे कामुक हालचालींवर वाढता भर दिला जात आहे. 'Be sexy and have sex' हीच व्यापारी नीती या सगळ्यातून लोकांच्या मनावर ठसवली जात आहे.

जिथे वस्तुविक्री आणि व्यापार वाढवण्यासाठी चंगळवाद, भोगवादच जोपासला जात आहे, तिथे आचारशुचिता, सुसंस्कार याकडे कोण लक्ष देणार? यामुळे लैंगिक शिक्षणाचा व्हावा तसा प्रसार झालेला दिसत नाही. अधून मधून शाळा-कॉलेजांमधून लैंगिक शिक्षणाच्या, एड्स प्रतिबंधाच्या चळवळी निर्माण होतात, पण त्या लगेच थंड पडतात.

गेल्या ११ वर्षांत ५/६ जागतिक परिषदांना, भारतात आणि भारताबाहेर मी हजर राहिले, शोधनिबंध सादर केले, जगभरच्या विविध लैंगिक शिक्षणतज्ज्ञांशी माझ्या ओळखी झाल्या.

११ वर्षांपूर्वी एड्सच्या इतर देशांतल्या बातम्या आपण वाचत होतो, पण आता एड्स भारतात भरपूर वाढला आहे. एड्सच्या भारतातील लागणीमध्ये आणि रुग्णांमध्ये प्रचंड वाढ सतत होत आहे.

पण म्हणून स्वैर लैंगिक संबंधांचं प्रमाण कमी झाल्याचं आढळत नाही. कारण भोगवादी वृत्तीला चंगळवाद, सतत खतपाणी घालत असतो. त्यामुळे नुसता 'safer sex', 'स्वैर संबंधात निदान निरोध तरी वापरा' एवढाच प्रचार केला जातो. मात्र या प्रचारामुळे एड्सचा प्रसार थांबेल अशा भ्रमात कोणीही राहू नये.

तर एकंदर लैंगिक बाबतीत शिस्त, संयम, अमर्यादित लैंगिक सुखासाठी मर्यादित लैंगिक स्वातंत्र्य, आपल्या सुखाचा विचार करताना समाजातल्या इतरांचं स्वास्थ्य बिघडणार नाही ना अशी काळजी घेण्याची सुजाण वृत्ती सर्वांच्या अंगी बाणवणं आवश्यक आहे, तरच 'कामविश्वा'तले असंख्य धोके टळतील हे आवर्जून सांगावंसं वाटतं.

**– डॉ. लीना विलास मोहाडीकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ○ अर्धनारी नटेश्वर | .................... | ९ |
| ○ पुरुष असे का वागतात ? | .................... | ३४ |
| ○ माघार 'मदना'ची | .................... | ४५ |
| ○ मदनज्वालेतील थंड रती | .................... | ५७ |
| ○ संशयकल्लोळामागचा काम | .................... | ७६ |
| ○ बिगारीतले शृंगारी | .................... | ९४ |
| ○ हा खेळ नवरेपणाचा | .................... | ११४ |
| ○ व्यभिचाराचे शेपूट वाकडे | .................... | १३० |
| ○ कामवंचितेचा कैवारी | .................... | १४० |
| ○ कामअतृप्तांचे वळसे | .................... | १५८ |
| ○ लक्ष्मण रेषेतले व्यभिचारी | .................... | १७४ |
| ○ यातना मम कामसखी | .................... | १८९ |
| ○ सुपातले अन् जात्यातले | .................... | २०१ |
| ○ अजून यौवनात मी | .................... | २१० |
| ○ साठीतला वासू | .................... | २३० |
| ○ रडक्या पुरुषार्थाला सेक्सचा आधार | .................... | २४३ |
| ○ पत्नी और वो | .................... | २५१ |


✦✦

# अर्धनारी नटेश्वर

''अरेच्या, मघापासून ऐकतेय मी, की म्हणे हिला स्वातंत्र्य दिलं, मोकळीक दिली, हिला घर दिलं, सगळ्या सुखसोई दिल्या, मुलगा दिला, हे दिलं, ते दिलं हा काय प्रकार आहे तुमचा?'' सुनंदानं नवऱ्याला सुरेशला प्रश्न केला. स्वर शक्य तितका शांत ठेवत आणि नवऱ्याला बोलण्याची संधी न देता लगेच ती म्हणाली,

''तुम्हाला असं म्हणायचं आहे का, की मी लग्न केलं तुमच्याशी म्हणजे जसं काही मला एक गुलाम म्हणून विकत घेतलं तुम्ही आणि मग उपकार केल्यासारखं, उदारपणा दाखवून मला काही सवलती तुम्ही दिल्या, ज्या इतर गुलामांना मिळत नाहीत, आणि आता मिळालेल्या या सवलतींमुळे मी मात्र जादाच शेफारले आहे व तुमच्या उपकारांची जाणच ठेवत नाही? काय हो?''

पण सुनंदाशी सरळ न बोलता सुरेशनं मलाच उद्देशून म्हटलं, ''बघा डॉक्टर, ऐकलंत ना माझ्या बोलण्याला कसा विपर्यास करते ही? कसे स्वत:च्याच मनातले अर्थ माझ्या बोलण्याचा लावते आणि भासवते की माझ्या मनातच तसं आहे. आणि हे नेहमीचंच आहे.''

पण सुनंदाही गप्प बसणारी नव्हती. उलट नवऱ्याला अगदी नाव घेऊनच ती म्हणाली, ''सुरेश, मी माझे अर्थ तुमच्या बोलण्याला लावले नाहीत. विचारा हवं तर डॉक्टरांना. मी उलट तुमच्याच ह्या दिलं दिलंच्या घोषाचं जास्त स्पष्टीकरण मागतेय तुमच्याकडून.''

‘‘स्पष्टीकरण काय करायचं त्यात? तेलगूत की कानडी भाषेत थोडंच बोललो मी? साध्या, सरळ, स्वच्छ मराठीतच बोलतोय ना?’’ सुरेशनं उत्तर दिलं.

‘‘तेच म्हणतेय मी,’’ सुनंदा अजूनही ठाम आणि शांत स्वरातच म्हणाली, ‘‘मराठीतच बोललं तरी एका शब्दाचे दोन किंवा अनेक अर्थही निघतात. म्हणून म्हटलं, तुम्हाला नक्की कुठला अर्थ अभिप्रेत आहे ते विचारावं. नाहीतरी मी अर्थाचा विपर्यास करते, असं तुम्ही आत्ताच डॉक्टरांपुढे म्हणालात ना!’’

सुरेशला खरं म्हणजे सुनंदाचा प्रश्न कळला होता. परंतु व्यवस्थित उत्तर काय द्यावं हे तो शोधत असावा मनात, असं मला वाटू लागलं, एकूण त्याच्या हालचालीवरून. आता अर्थात ‘सवाल–जवाबा’चा सामना खेळायला काही ते दोघं माझ्या कन्सल्टिंग रूममध्ये आले नव्हते. आणि मीही काही तिथे पंच म्हणून बसले नव्हते.

त्यांच्यातले मतभेद मिटावेत आणि ते कसे मिटवावे याचं योग्य ते मार्गदर्शन मिळावं म्हणून तर माझ्या मदतीची आवश्यकता त्यांना भासली होती. म्हणूनच त्या दृष्टीनं गप्प राहून दोघांचे संवाद ऐकत राहणं मला चालणार नव्हतं. बोलण्या बोलण्यातून दोघेही स्वत:चे स्वभाव व्यक्त करत होतेच आणि योग्य तिथे त्यांची मतं सुधारणं हे लैंगिक वैवाहिक समस्या मार्गदर्शक डॉक्टर म्हणून माझं कर्तव्यच होतं. आणि म्हणून मी सुरेशला त्याच्या बोलण्यात जबाबदारी यावी या हेतूनं म्हटलं,

‘‘मघापासून तुमच्या बोलण्यात तुम्ही तुमच्या पत्नीला म्हणजे सुनंदाला स्वातंत्र्य दिलं, सर्व मोकळीक दिली, वगैरेचा निदान सात–आठ वेळा तरी उल्लेख केला हे मीही ऐकलं. तेव्हा असं स्वातंत्र्य देऊन तुम्ही पस्तावलात, कारण पत्नी तुमचं ऐकत नाही, किंवा स्त्री म्हणजे गुलाम, आधी वडिलांच्या घरात, पण विशेषत: लग्नानंतर जास्त, कारण पती हा तिचा मालक, त्यामुळे पारतंत्र्य हेच तिचं नशीब, तीच तिची लायकी, अन् नवरा ठेवेल तसं तिनं राहावं, यापैकी तुम्हाला खरं काय वाटतं ते सांगून टाका.’’

‘‘माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की इतर नवरे त्यांच्या बायकांना किती ताब्यात ठेवतात, किती बंधनं घालतात, नवऱ्याला विचारल्याशिवाय काहीही करण्याची त्यांची ताकद नसते, एवढं धाकात ठेवतात. असं तर मी केलं नाही? उलट स्वातंत्र्यच दिलं. म्हणजे चांगुलपणाच नाही का माझा?’’ सुरेशनं खुलासा केला.

‘‘मी लग्न तुमच्याशी केलं, इतरांशी नाही. त्यामुळे इतर पुरुषांचे दाखले देऊन किंवा त्यांच्या तुलनेत तुम्ही खूप चांगले वागता हे म्हणणं तुमचीच प्रतिष्ठा कमी करणारं आहे.’’ सुनंदा मुद्देसूद बोलत होती.

''मी चांगला वागतो याने माझी प्रतिष्ठा कशी काय कमी होते? डॉक्टर, तुम्हाला तरी कळलं का हिचं बोलणं?'' सुनंदाला आपण कुठे तरी कैचीत पकडलं या समाधानात सुरेश म्हणाला.

पण सुनंदाला माझ्या मदतीची गरजच नव्हती. ''मी सांगते ना सोपं करून अजून. इतर नवऱ्यांशी तुम्ही तुमची तुलना करता अन् स्वत:ला चांगलं समजता या संदर्भात मी प्रतिष्ठेबद्दल म्हटलं. कारण तुलनेसाठी तुम्ही कोणते पुरुष नवरे निवडले तर जे बायकोला धाकात ठेवतात, तिच्यावर बंधनं घालतात, पोतेऱ्यासारखं वागवतात, एक माणूस म्हणून तिला मान्यताच देत नाहीत. प्रसंगी दारू पिऊन मारहाण, शिवीगाळ करतात ते. बायकोनं आपल्या हुकुमाशिवाय काहीही करता कामा नये, मुकाटपणे खाली मान घालून तिने काम करावं, पोरं वाढवावीत, चुलीपुरती अक्कल वापरणं हेच तिचं जीवन, हीच तिची लायकी असं समजणारे, पोरं चांगली निघाली तर त्यांचं कर्तृत्व आपल्याकडे घेणारे आणि वाईट निघाली तर बायकोमुळे असं मानणारे पुरुष तुम्ही स्टँडर्ड मानता, आणि त्या तुलनेत स्वत:ला तुम्ही चांगलं समजता, हे तुम्हाला कमीपणा देणारंच नाही का? म्हणजे तुम्ही तसं वागत नाही हे माझं नशीब समजायचं. किंबहुना बायकोशी तसं वागणंच योग्य असंही तुमचं मत असेल.

''म्हणजे याचाच अर्थ असा की जे पुरुष पत्नीचं पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य मानतात, संसार समान जबाबदारीच्या भूमिकेतून करतात, दुटप्पीपणा करत नाहीत, त्यांच्या तुलनेत तुम्ही तर माझ्याशी हुकूमशहासारखे वागता असं मी म्हणेन. मग तुमचा चांगुलपणा कुठे राहिला?''

''हुकूमशहा? अर्थात तुझा हा आरोप मला नवीन नाही'' नंतर मला उद्देशून सुरेश म्हणाले, ''डॉक्टर, बघितलंत ना किती वाद घालायची सवय आहे हिला ती? आपलं थोडं काही बोललं की हिचं हे असं शब्दांचे कीस काढणं, शब्दांचे ढीग रचणं चालू होतं. असं वाटतं की कुठून विषय काढला, अन् वर मलाच हुकूमशहा म्हणते! सांगा जरा दोन गोष्टी समजावून हिला.''

''शब्दांचे ढीग, शब्दांचे कीस असं तुम्हाला वाटतं, कारण तुम्ही माझ्या बोलण्यातला अर्थ कधीच समजावून घेत नाही. माझ्या व्यवस्थित खुलाशालादेखील तुम्ही वाद घालणंच म्हणता... कारण तुमच्याकडे माझ्या युक्तिवादाला समर्पक उत्तर नसतंच आणि ते तुम्ही देऊ शकत नाही म्हणून तुम्हाला चीड येते, तुम्ही चडफडता, तुमचा इगो दुखावतो. पण हा पराभव मान्य करण्याने तुम्हाला कमीपणा येणार असतो,

असं तुम्ही मानता. आणि तो कमीपणा सहन करणं तुमच्या आवाक्याबाहेरचं असतं, कारण परत इगो! मग ह्या इगोला समजावण्यासाठी बायकोच बाष्कळ बोलतेय, कुठे दर वेळेस तिला उत्तर द्या, नुसता पोकळ वाद घालते, हा मार्ग सापडतो. व्यवस्थित बोलली असती तर समर्पक उत्तर दिलं असतं, पण नवऱ्याला असं बोलू नये हे सुद्धा कळत नाही तिला... असेच विचार मनात येतात की नाही तुमच्या?'' सुनंदानं बिनतोड युक्तिवाद केला.

सुनंदानं सुरेशच्या मर्मावर बोट ठेवलं होतं हे नक्कीच. व्यक्तीच्या अहंभावाचा, मीपणाचा म्हणजेच सर्वसामान्यत: ज्याला 'इगो' असे संबोधले जाते त्याचा उल्लेख तिने चपखलपणे केला होता. एखाद्यावर 'मी'पणाच्या प्रदर्शनाचा आरोप केला की ती व्यक्ती लगेच खवळून उठतेच. म्हणजे अप्रत्यक्षपणे या खवळण्यातून सुद्धा आपोआप 'मीपणा' व्यक्त होतोच हे त्या व्यक्तीच्या ध्यानातही येत नाही.

हा 'इगो' किंवा 'मीपणा' किंवा 'अहंकार' म्हणजे नक्की काय? तो प्रत्येक व्यक्तीला, प्राणिमात्राला असतोच का? अर्थात असतोच. त्याशिवाय कोणीही प्राणिमात्र जिवंत राहूच शकत नाही. स्वत:चं अस्तित्व टिकून राहावं यासाठी प्रत्येक प्राणिमात्राला धडपड करावीच लागते. म्हणजे स्वत:च्या जीवितासाठी प्राणवायू मिळवणं, अन्नपदार्थ मिळवणं, नको असलेला भाग शरीराबाहेर टाकणं या क्रिया होतातच. म्हणजेच स्वत:साठी हे आवश्यक घटक हवेत. याच गरजेतून स्वत:कडे जास्त लक्ष देणं आणि आवश्यक तेव्हा इतरांशी स्पर्धा करून त्यांच्यावर मात करणं हे सुद्धा ओघाओघानं आलंच. प्रत्येक प्राणिमात्राला कमी-अधिक विचारशक्ती म्हणजेच मेंदू ही संस्था निसर्गानं दिलीच आहे, जिचा उपयोग करून प्रत्येक प्राणिमात्र इतरांपेक्षा प्रत्येक बाबतीत स्वत:लाच प्राधान्य कसं मिळेल हे बघत असतो. यातूनच ईर्षा, ईर्षेतून हिंसाचार वगैरे प्रवृत्ती स्वमहत्त्व कमी होऊ न देण्यासाठी जन्माला आल्या. अर्थात मानवांमध्ये सर्वजण एकत्र राहू लागल्यावर स्वास्थ्य टिकवण्यासाठी वागण्याचे नीतीनियम तयार झाले. त्यामुळे हिंसाचाराला काही प्रमाणात आळा बसला. तरीपण 'मीपणा' हा काही नष्ट होऊ शकला नाही आणि होणारही नाही. या अहंभावाचं, म्हणजे स्वत:विषयीच्या मनाच्या व प्रीतीच्या कल्पनेचं उत्कृष्ट उदाहरण महाभारतात आहे. कौरव-पांडवांचं अठरा अक्षौहिणी सैन्य युद्धासाठी समोरासमोर उभे ठाकल्यावर धर्मराजांनी नवल वाटून कृष्णाला विचारलं, 'कृष्णा, अशा कुठल्या विचारांनी भारून, स्वत:च्या जिवाची आशा सोडून प्रत्येकजण इथे युद्धाला जमला आहे?' यावर कृष्णानं

फार सुंदर व समर्पक उत्तर दिलं, तो म्हणाला, 'धर्मराज, इथे जमलेल्या प्रत्येक युद्धोत्सुक व्यक्तीला वाटतंय की, 'मी' सोडून म्हणजे स्वत:शिवाय बाकीचे सगळे मारले जाणार आहेत.'

अर्थात 'मीपणा'हा प्रत्येकाला जन्मापासून मरेपर्यंत असणारच अन् तो अवश्य असावा. पण तो मर्यादित स्वरूपात म्हणजे स्वत:च्याच विकासाच्या दृष्टीने. पण या 'मीपणा'च्याच आहारी जेव्हा माणूस जातो, स्वत:च्या श्रेष्ठत्वाच्याच कल्पनेत जास्त गुंतून पडायला लागतो, तेव्हा मग या अहंभावाची किंवा 'इगो'चीच गुर्मी त्याला चढायला लागते. त्यामुळेच प्रत्येक क्षणी स्वत:चा मान, स्वत:चं महत्त्व जपण्याचा आटोकाट प्रयत्न तो करू लागतो, दुसऱ्यांनाही मान आहे, महत्त्व आहे हे विसरून. म्हणजेच अशी व्यक्ती इतरांबाबत असहिष्णु बनते, अरे म्हटलं की कारे म्हणायला तयार असते.

कोणतीही अतिक्षुल्लक, क्षुल्लक, लहानमोठी घटनाही अनेक कारणांनी घडत असते आणि तिला अनेक बाजू असतात. पण हे समजून न घेता मला समजलेली बाजूच खरी, असाच अट्टाहास 'मीपणा'मुळे केला जातो. अशा अति अहंकारी व्यक्तीची 'माझ्या समजुती, माझे विचार, वागणं हे माझ्या बुद्धीमुळे, माझ्या अनुभवांमधून बनलेलं आहे. हे खोटं कसं असणार, नव्हे तेच खरं, इतरांनी मला शिकवू नये, बोलू नये, या स्वत:संबंधीच्या घट्ट विणलेल्या कोषातून बाहेर पडण्याची तयारी नसते. अशा रीतीने स्वत:चं महत्त्व, स्वत:चा 'इगो' राखणं याकडेच सतत लक्ष असल्याने कुठलीही घटना ही नीट समजून घेतली न जाणं हेच अशा या अहंकारी व्यक्तीचं प्रमुख स्वभावलक्षण सांगता येतं. स्वभावातला तापटपणा, रागीटपणा, भडकसंतापी वृत्ती, दुसऱ्याला टोचून लागेल असं बोलणं, पटदिशी समजण्यापेक्षा गैरसमजच करून घेणं; उतावीळपणे निर्णय घेणे ही सर्व वैशिष्ट्यं आपोआपच अशा अहंकारी व्यक्तीच्या बोलण्या-चालण्यात दिसून येतात. कारण इतरांचं म्हणणं ऐकणं, स्वत:च्या समजुती खोट्या आहेत असं आढळून येणं वगैरेमुळे आपलं महत्त्व कमी होईल अशीही भीती या अहंभावी व्यक्तींना वाटत असते. त्यामुळे अगदीच नाइलाज झाल्याशिवाय आणि परिस्थितीच तशी असल्याशिवाय अशा व्यक्ती तडजोडीला कधीच तयार नसतात. अर्थात समोर उभी ठाकलेली व्यक्ती बळानं, बुद्धीनं बलिष्ठ असेल तर मग स्वत:चा 'इगो' जरा बाजूला ठेवून अशी व्यक्ती लाचारी किंवा तेवढ्यापुरती विनयशीलता धारण करू शकते. जसं घरात चिडणारा, अधिकारशाही गाजवणारा पुरुष, गल्लीतल्या दादासमोर मात्र दात विचकून खुशामत करून विनयानं वागतो किंवा ऑफिसमध्ये बॉसची मात्र हांजीहांजी